# कृषि विभाग जिल्हा परिषद,अहिल्यानगर

**अनुसुचित जाती/नवबौध्द व आदिवासी शेतक-यासाठी नविन विहिर,जुनी विहीर दुरुस्ती व इतर घटकांचा लाभ**

अनुसूचित जाती/नवबौध्द शेतक-यांचे आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविण्यासाठी शासनाने अनुसुचित जाती/नवबौध्द शेतक-यांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना,आदिवासी शेतक-यांसाठी बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत अनुसुचित जाती व जमातीच्या शेतक-यांना पुढीलप्रमाणे घटकांसाठी पॅकेज स्वरुपात अथवा मागणीनुसार अनुदान देण्यात येईल.

| बाब | अनुदान मर्यादा रुपये | |
|---|---|---|
| | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना** | **बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील)** |
| नवीन सिंचन विहीर | 4,00,000/- | 4,00,000/- |
| जुनी विहीर दुरुस्ती | 1,00,000/- | 1,00,000/- |
| शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रु.2,00,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. | राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रु. 2,00,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. |
| इनवेल बोअरींग | 40,000/- मर्यादेत | 40,000/- मर्यादेत |
| वीज जोडणी आकार | 20,000/- (किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.) | 20,000/- (किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.) |
| पंपसंच(डिझेल/विद्युत) | 10 अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 90% किंवा रू. 40,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. | 10 अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 90% किंवा रू. 40,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. |
| सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंप संच ऐवजी) | प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 90% किंवा रू. 50,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. | प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 90% किंवा रू. 50,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. |
| एचडीपीई/पीव्हीसी पाईप | अन्न आणि पोषण सुरक्षा अन्नधान्य पिके या। योजनेंतर्गत प्रती मीटर करिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १००% किंवा रू. 50,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. | अन्न आणि पोषण सुरक्षा अन्नधान्य पिके या। योजनेंतर्गत प्रती मीटर करिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १००% किंवा रू. 50,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. |
| तुषार सिंचन संच (पुरक अनुदान) | राज्यशासनाकडुन 55% अनुदान प्राप्त असलेल्या लाभार्थींना उर्वरीत 35% रक्कम किंवा रू. ४७,०००/- यापैकी जे कमी असेल ते पुरक अनुदान अनुज्ञेय राहील. | राज्यशासनाकडुन 45% अनुदान प्राप्त असलेल्या लाभार्थींना उर्वरीत 45% रक्कम किंवा रू. ४७,०००/- यापैकी जे कमी असेल ते पुरक अनुदान अनुज्ञेय राहील. |
| ठिबक सिंचन संच (पुरक अनुदान) | राज्यशासनाकडुन 55% अनुदान प्राप्त असलेल्या लाभार्थींना उर्वरीत 35% रक्कम किंवा रू. ९७,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. | राज्यशासनाकडुन 45% अनुदान प्राप्त असलेल्या लाभार्थींना उर्वरीत 45% रक्कम किंवा रू. ९७,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. |
| यंत्रसामुग्री (बैलचलित/ट्रॅक्टरचलित अवजारे) (नवीन बाब) | 50,000/- | 50,000/- |
| परसबाग | 5,000/- | 5,000/- |
| विंधन विहीर (नवीन बाब) | --------- | 50,000/- किंवा प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.<br>(फक्त वनक्षेत्रातील आदिवासी शेतक-यांना) |

(मागील पानांवर)

# लाभार्थी पात्रतेचे निकष

१. लाभार्थी अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी असणे बंधनकारक राहील.

2. शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

3. शेतकऱ्याच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे. (नगर पंचायत, नगरपालीका व महानगर पालिका क्षेत्राबाहेरील (संदर्भ शासन पत्र क्र.संकीर्ण-2017/प्र.क्र.142/3अ,दि.24 एप्रिल 2018)

4. लाभार्थ्यांचे स्वतःचे बँक खाते असणे व सदर बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.

5. दारीद्रय रेषेखालील तसेच महिला व अपंग लाभार्थ्यास प्रथम प्राधान्य राहील.

6. सदर योजनेच्या लाभार्थ्यांसाठी लागू असलेली रु.१,५०,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात आलेली आहे.

7. योजनेतील नमुद घटकांचा लाभ घेणेकामी शेतकऱ्याकडे किमान ०.४० हेक्टर व कमाल ६ हेक्टर एवढी शेत जमीन असणे आवश्यक असेल. मात्र, शेतक-यांच्या जमीनी दुर्गम भागात व विखंडीत असल्यास ०.४० हे. पेक्षा कमी जमीन धारणा असलेले दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास त्यांची एकत्रित जमीन किमान ०.४० हे. इतकी होत असल्यास त्यांनी करार लिहून दिल्यास त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. त्याचप्रमाणे दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना कमाल ६.० हे. धारणक्षेत्राची अट लागू असणार नाही.

8. एकदा संबंधित योजनेचा पूर्ण लाभ घेतल्यास पुढील पाच वर्ष त्याच लाभार्थ्यास किंवा कुटूंबास या योजनेचा लाभ देय होणार नाही. नवीन विहीर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यास २० वर्षानंतर जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ अनुज्ञेय राहील.

9. अशाच स्वरुपाच्या कृषी विषयक विकास योजनेकरता आदिवासी उपयोजनेतून तसेच केंद्र शासनाच्या SCA व घटनेच्या कलम २७५ (A) अंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजनेतून लाभ दिला असल्यास या योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

10.सदर योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या ७/१२ उत्ताऱ्यावर त्याबाबतची नोंद घेण्यात येईल.

योजनेत सहभागी होण्यासाठी https://mahadbt.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा, लाभार्थी निवड सोडत प्रक्रियेव्दारे ऑनलाईन करणेत येईल. अधिक माहितीसाठी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी किंवा कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.

**कृषि विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर**

बायोगॅस संयंत्राची किमया भारी,

वेळ आणि परिश्रम वाचेल सदोपरी, आरोग्य संपदा घरोघरी !

**नविन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत व्यवस्थापन कार्यक्रम**

**सन 2024 - 25**

**बायोगॅसचे फायदे** :- 1) बायोगॅस घरगुती वापरासाठी प्रदुषण विरहीत इंधन म्हणून उपयुक्त 2) प्रकाशासाठी विद्युत दिवा लावण्यासाठी देखील उपयुक्त 3) वृक्ष तोड कमी होते, प्रदुषणाचा त्रास कमी होतो व पर्यावरणाचे संवर्धन होते. 4) उत्तम प्रतीचे सेंद्रिय खत तयार होते, त्यामुळे रासायनिक खताची बचत व जमिनीचा पोत सुधारतो. 5) धुरामुळे होणारा त्रास टाळता येतो, त्यामुळे महिलांच्या आरोग्याची हानी टाळता येते. 6) इतर इंधनाची बचत होते, त्यामुळे खर्चात कपात होते.

**2 ते 25 घनमिटरचे बायोगॅस संयंत्रासाठी खालिलप्रमाणे अनुदान उपलब्ध आहे.**

| **प्रवर्ग** | **1 घनमीटर** | **2 ते 4 घ.मी** | **6 घ.मी** | **8 ते 10 घ.मी** | **15 घ.मी.** | **20 ते 25 घ.मी** |
|---|---|---|---|---|---|---|
| **सर्वसाधारण** | रु.9800/- | रु.14350/- | रु.22750/- | रु.23000/- | रु.37950/- | रु.52800/- |
| **अनुसुचित जाती/जमाती** | रु.17000/- | रु.22000/- | रु.29250/- | रु.34500/- | रु.63250/- | रु.70400/- |
| संयंत्रास शौचालय जोडल्यास अतिरिक्त अनुदान रक्कम रु.1600/- अनुज्ञेय राहील.<br><br>तसेच पुर्ण झालेल्या बायोगॅस संयंत्रास जिल्हा परिषद सेस फंडा सन 2024-25 मधून रक्कम रु. 4960/- प्रोत्साहन अनुदान देण्यात येईल. | | | | | | |

**लाभार्थी निवडीसाठीचे आवश्यक कागदपत्रे**: 1) biogas.mnre.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक. 2) लाभार्थ्याचे नावावर ७/१२ , ८ अ खाते उतारा असावा 3) आधारकार्ड झेरॉक्स 4)पशुधन असले बाबतचा दाखला. 5) ग्रामसेवकाचा रहिवासी दाखला 6)संयंत्र बांधकामासाठी जागा उपलब्ध असावी. 7)आधारलिंक बँकपासबुकची छायांकित प्रत.

**-:अधिक माहितीसाठी संपर्क साधावा:-**

1) ग्रामपंचायत स्तर - ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी

2) तालुकास्तर - कृषि अधिकारी/ विस्तार अधिकारी, (कृषि), पंचायत समिती

3) जिल्हास्तर - कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद

अहमदनगर फोन : 0241 - 2353693

1. **ग्रामिण भागातील शेतक-यांना स्लरी फिल्टर उपकरण** (50 **टक्के किंवा रक्कम रु**.20,000/- **मर्यादेपर्यंत** ) **अनुदानावर देणे**. **रक्कम रु**.7.50 **लक्ष**

**योजनेचे फायदे:-**

1. या उपकरणाच्या माध्यमातून जीवामृत/गोबर गॅस स्लरी पुर्णपणे गाळून मिळते व त्याला ठिबक सिंचनामधून देता येते.

2. शेतीचे आरोग्य सुधारण्यासाठी अनेक शेतकरी सेंद्रिय शेतीकडे सध्या वळत आहेत. मात्र शेण स्लरी/जीवामृत हाताने संपुर्ण शेतात देणे खुप वेळ वाया घालवणारी तसेच शारीरीक कष्टाचे काम आहे. परंतु या उपकरणाच्या वापरामुळे वेळ वाया जाणे तसेच शारीरीक कष्ट करण्याची आवश्यकता भासत नाही.

3. यामुळे स्लरी देण्याच्या कामात लागणारी 100 टक्के मजुरी खर्च कमी होतो तसेच रासायनिक खतांच्या खर्चात मोठी बचत होते.

4. जीवामृत/गोबर गॅस स्लरी हे नैसर्गिक शेतीचे अविभाज्य अंग आहे. यापासुन पिकाला लागणारे विविध मुख्य अन्नद्रव्य (नत्र, स्फुरद, पालाश) दुय्यम अन्नद्रव्य (कॅल्शियम, मॅग्रेनियम,सल्फर) व सुक्ष्म अन्नद्रव्य (लोह,मॅगनीज,बोरॉन इ.) मिळतात. त्याचबरोबर जमिनीत गरजेचे असलेले अनेक बॅक्टेरिया जीवामृत/शेण स्लरी मधुन उपलब्ध होतात. याच्या परिणाम स्वरुप मातीचा पोत सुधारतो, आधिच उपलब्ध असलेल्या अन्नद्रव्यांचा संपुर्ण वापर होऊन गुणवत्ता सुधारते या उपकरणाच्या पध्दतीने वापर केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन शेतक-यांच्या उत्पन्न वाढवण्यात मदत होते.

**<u>योजनेच्या अटी व शर्ती</u>**

1. अल्प भुधारक / अत्यल्प भूधारक लाभार्थ्याची निवड करण्यात येऊन अनुसुचित जाती/नवबौध्द शेतकरी, अनुसुचित जमाती/आदिवसासी शेतकरी/महिला/अपंग यांना प्राधान्य देण्यात यावे.
2. लाभार्थी सूक्ष्मसिंचन/फळबागधारक/भाजीपाला/ऊस लागवड करणारा असावा.
3. 8 अ व 7/12 उतारा आवश्यक राहिल.
4. लाभार्थी पुरेशे पशुधन असलेला असावा. पशूधन पर्यवेक्षक यांचा दाखला आवश्यक राहिल.
5. लाभार्थ्यांना आवश्यकतेनुसार 1100/1300/2100 लिटर क्षमतेचे मॉडेल निवडण्याची मुभा राहील.
6. शासन मान्यताप्राप्त संस्थेचा तपासणी अहवाल आवश्यक राहील
7. सदर योजनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्हयातील जि.प.क्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांची कृषि अधिकारी/विस्तार अधिकारी (कृषि),पंचायत समिती यांनी उपलब्ध अनुदानाच्या अधिनराहून स्लरी फिल्टर उपकरण खरेदी करणेसाठी पं.स.स्तरावरुन पुर्व संमती देणेत यावी.
8. थेट लाभ हस्तांतरण योजना (डीबीटी) नमुद कार्यपध्दतीनुसार स्लरी फिल्टर उपकरण खरेदी करणे बंधनकारक राहील.

9. शेती उपयोगी साहित्य खरेदी बाबतची अधिकृत देयके प्राप्त झालेनंतर प्रत्यक्ष मोका तपासणी करुन मंजुर अनुदान लाभार्थींचे आधार सलंग्न बँक खाती वर्ग करणेत यावे.
10.सदरची योजना दि.31 मार्च 2025 पर्यंत कार्यान्वित राहील.

-----------

**-:अधिक माहितीसाठी संपर्क साधावा:-**

1) ग्रामपंचायत स्तर - ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
2) तालुकास्तर - कृषि अधिकारी/ विस्तार अधिकारी, (कृषि), पंचायत समिती
3) जिल्हास्तर - कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
अहमदनगर फोन : 0241 - 2353693

**2.शेतक-यांना कडबाकुटटी मशिनसाठी किंमतीच्या 50 टक्के अर्थसहाय करणे.**
**(प्रति लाभार्थी अनुदान रु.9000/- प्रमाणे) रक्कम रु.30.00 लक्ष**

योजनेचे फायदे :-

1.कडबाकुटटीमुळे पशुधनास चा-याची कुटटी तयार करुन खावू घातल्यास त्या चा-याचे पशुधनास चांगल्याप्रकारे रवंथ करता येते.

2.चा-याची कुटटी करुन मुरघास तयार करता येतो.

3.चा-याची बारिक कुटटी होत असल्याने चारा वाया न जाता चा-याची बचत होत असते.

4.चा-याच्या बारीक कुटटीमुळे जनावरांना रवंथ करणे सोयीचे होते त्यामुळे जनावरांच्या दुधउत्पादनामध्ये वाढ होते.

कडबाकुटटी खरेदी करणा-या लाभार्थीची निवडीसाठी अटी व निकष :-

1) संबंधीत शेतकरी लाभार्थ्यांने शेती असले बाबत पुरावे दाखल 8 अ व 7/12 उतारा देणे बंधनकारक राहिल.
2) प्रस्तावा सोबत शेतक-यांकडे पशुधन असलेबाबतचा पशुधन पर्यवेक्षक/ पशुधन विकास अधिकारी यांचा दाखला आवश्यक आहे.
3) या योजनेचा लाभ जिल्हा परिषद कार्यक्षेत्रातील अल्प व अत्यल्प भुधारक, महिला, अपंग, शेतकरी लाभार्थी यांना गट निहाय उद्दिष्टा नुसार देण्यात यावा.
४) निवड केलेल्या शेतक-यांनी निश्चित केलेल्या तांत्रिक मापदंडानुसार जिल्हास्तरावर/ तालुकास्तरावर उपलब्ध असलेल्या अधिकृत विक्रेत्यांकडून/उत्पादकांकडून डीबीटी कार्यपध्दतीनुसार त्यांच्या पसंतीने मोटार विरहीत कडबाकुट्टी सयंत्र खरेदी करणे बंधनकारक राहिल.

| Technical Specification | |
|---|---|
| Description of Goods with details of Specification | |
| Name of Implement :- | Power operated Chaff cutter 3 HP W/O Electric Motor (R/F model) |
| Testing Institute :- | FMT&TIs/Dangerous machinery Act,1983 (IS:9020) |
| Testing Standards :– | IS:1511:2000 IS:7897:1996 IS:11459:1985 |
| Weight & other Specification :- | 3HP motor, 1440 rpm, Wt 110.00 to 207.00 kg without prime mover, Wt 102.00 to 231.00 kg with prime mover Safety Guard Provided |

५) वरिल तांत्रिक मापदंडा प्रमाणे पुर्णदराने खरेदी केलेल्या मोटार विरहीत कडबाकुट्टी सयंत्राच्या किंमतीच्या 50 टक्के अथवा रक्कम रु.9000/- यापेक्षा कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहिल.
६) कडबाकुट्टी सयंत्रासाठी आवश्यक असणारी इले.मोटार लाभार्थीनी स्वत:कडील वापरावी अथवा स्वखर्चाने खरेदी करावी त्यास अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

-----------

**-:अधिक माहितीसाठी संपर्क साधावा:-**

1) ग्रामपंचायत स्तर – ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
2) तालुकास्तर – कृषि अधिकारी/ विस्तार अधिकारी, (कृषि), पंचायत समिती
3) जिल्हास्तर – कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
अहमदनगर फोन : 0241 - 2353693

**3.नविन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत उभारणी केलेल्या बायोगॅस सयंत्रासाठी प्रोत्साहनपर अनुदान देणे. (प्रति लाभार्थी अनुदान रक्कम रु 4960/-) रक्कम रु.12.50 लक्ष**

**योजनेचे फायदे :-**

1.बायोगॅस घरगुती वापरासाठी प्रदुषण विरहीत इंधन म्हणून अंत्यंत उपयुक्त आहे.
2.प्रकाशासाठी विदयुत दिवा लावण्यासाठी देखील उपयुक्त आहे.
3.वृक्षतोड कमी होते, प्रदुषणाचा त्रास कमी होतो व पर्यायाने संवर्धन होते.
4.उत्तम प्रतीचे सेंद्रिय खत तयार होते. त्यामुळे रासायनिक खताची बचत व जमिनीचा पोत सुधारतो.
5.धुरामुळे होणारा त्रास टाळता येतो. त्यामुळे महिलांच्या आरोग्याची हानी टाळता येते.
6.इतर इंधनाची बचत होते, त्यामुळे खर्चात कपात होते.

**लाभार्थींची निवडीसाठी अटी व निकष :-**

1) biogas.mnre.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक. 2)लाभार्थ्याचे नावावर ७/१२, ८ अ खाते उतारा असावा 3) आधारकार्ड झेरॉक्स 4)पशुधन असले बाबतचा दाखला.5) ग्रामसेवकाचा रहिवासी दाखला 6)संयंत्र बांधकामासाठी जागा उपलब्ध असावी. 7)आधारलिंक बँकपासबुकची छायांकित प्रत. 8)लाभार्थी जिल्हा परिषद कार्यक्षेत्रातील असावा.

-----------

**-:अधिक माहितीसाठी संपर्क साधावा:-**

1) ग्रामपंचायत स्तर – ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
2) तालुकास्तर – कृषि अधिकारी/ विस्तार अधिकारी, (कृषि), पंचायत समिती
3) जिल्हास्तर – कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
अहमदनगर फोन : 0241 - 2353693

**4.आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाला शेती उपयोगी साहित्य खरेदी करण्याकामी अनुदान देणे (प्रति लाभार्थी रक्कम रु.50000/-)**

**योजनेचे फायदे** :- आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाला शेती उपयोगी साहित्य देऊन त्यांचे जिवनमान सुधारण्यास प्रोत्साहन देणे.

**लाभार्थीची निवडीसाठी अटी व निकष :-**

1) महसुल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय दि.27 फेब्रुवारी 2006 अन्वये जिल्हास्तरीय गठीत केलेल्या समितीने शासकीय मदतीसाठी पात्र ठरविणेत आलेल्या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबास या योजनेअंर्तगत लाभ देण्यात यावा. 2) सदर योजनेअंतर्गत आत्महत्याग्रस्त शेतकरी पात्र कुटंूबास तालुकास्तरावरील कृषि अधिकारी/विस्तार अधिकारी, कृषि पंचायत समिती यांनी प्रत्यक्ष भेटीत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाकडून शेतीउपयोगी साहित्य मिळणेबाबत लेखी मागणीपत्र प्राप्त झाल्यावर उपलब्ध अनुदानाच्या अधिन राहून शेती उपयोगी साहित्य खरेदी करणेसाठी पंचायत समिती स्तरावरुन पुर्वसंमती देण्यात यावी.3) डीबीटी व्दारे नमुद कार्यपध्दतीनुसार शेतीउपयोगी साहित्य खरेदी करणे बंधनकारक राहील.4) खरेदी करण्यात आलेले शेतीउपयोगी साहित्य आयएसआय/बीआयएस मानंकाप्रमाणे असणे बंधनकारक राहील.5) शेती उपयोगी साहित्य खरेदी बाबतीची अधिकृत देयक प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष मोका तपासणी करुन मंजूर अनुदान लाभार्थ्यांचे आधार संलग्न बँक खाती वर्ग करण्यात यावे.

-----------

**-:अधिक माहितीसाठी संपर्क साधावा:-**

1) ग्रामपंचायत स्तर – ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
2) तालुकास्तर – कृषि अधिकारी/ विस्तार अधिकारी, (कृषि), पंचायत समिती
3) जिल्हास्तर – कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
अहमदनगर फोन : 0241 - 2353693